# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.07.2025**

**वारःबुधवार**

---

१.पंतप्रधान आजपासून ५ देशांच्या दौऱ्यावर

२.रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी एक लाख कोटी रुपयांच्या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

३.दहशतवादाला प्रत्युत्तर, बचाव आणि सीमेपलीकडच्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्याचा भारताला अधिकार : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

४.कैलास मानसरोवर यात्रेकरूंची पहिली तुकडी यात्रा पूर्ण करून सुखरूप परतली आणि

५.महाराष्ट्रासह, उत्तर आणि मध्य भारतात पावसाचा नारंगी बावटा जारी

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज घाना, त्रिनि-दाद आणि टोबॅगो; अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबिया या पाच देशांच्या दौऱ्यावर जात आहेत. पहिल्या टप्प्यात पंतप्रधान घानाला भेट देतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, उद्यापासून ते त्रिनि-दाद आणि टोबॅगो देशांना भेट देतील. त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या अध्यक्षा क्रिस्टीन कार्ला कांगालू आणि पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांच्याशी मोदी चर्चा करतील. दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यात, ४ जुलै रोजी अर्जेंटिना भेटी दरम्यान राष्ट्रपती मिलेई यांच्याशी पंतप्रधान चर्चा करणार आहेत. दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात, १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ५ ते ८ जुलै दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्राझीलला जातील. त्यांचा हा चौथा ब्राझील दौरा असेल. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, ९ जुलै रोजी मोदी नामिबियाला भेट देणार असून त्यांचा नामिबियाचा हा पहिलाच दौरा आहे.

**<u>केंद्रियमंत्रीमंडळ</u>**

देशात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी सुमारे एक लाख कोटी रुपयांच्या रोजगार-संबंधित प्रोत्साहन योजनेला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. दोन वर्षांच्या कालावधीत देशात साडेतीन कोटींहून अधिक नोकऱ्या निर्माण करण्याकरता प्रोत्साहन देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. यापैकी सुमारे दोन कोटी लाभार्थी हे पहिल्यांदाच कामाची सुरवात करणार आहेत. १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना या योजनेचे फायदा होणार आहे. उत्पादन क्षेत्रातील संस्थांना याकरता अनुदान दिलं जाणार असून या क्षेत्राला योजनेचा सर्वाधिक फायदा होईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पत्रकारांना सांगितलं.

केंद्रीय मंत्रिमंडळानं संशोधन विकास आणि नवोन्मेष योजनेलाही मंजुरी दिली. यासाठी एक लाख कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय क्रीडा जगतात पहिल्या पाच देशांत स्थान मिळवण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून - राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ लाही केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. युवकांमधील क्रीडा गुण ओळखून त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणं, उत्तम क्रीडांगण - क्रीडा प्रबोधिनींची स्थापना करणं, खेळांचे सामने आयोजित करून खेळाडूंना सातत्याने संधी उपलब्ध करून देणं आणि जनतेत क्रीडाविषयक जागरूकता निर्माण करणं , अशा विविध पैलूंचा, या धोरणात विचार केला गेला आहे.

**<u>युवा-कनेक्ट</u>**

विकसित भारत अभियानात युवकांना सक्रीय सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकारनं 'विकसित भारत युवा कनेक्ट' कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा शुभारंभ 12 ऑगस्ट 2025 रोजी संपूर्ण देशभर एकाच दिवशी होणार असून, या कार्यक्रमादरम्यान  पंतप्रधान नरेंद्र मोदी युवकांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी दिली. मांडवीय यांनी सर्व राज्यांच्या क्रीडा मंत्री आणि सचिवांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे काल संवाद साधला. देशातील युवकांचा विकसित भारत अभियानात जास्तीत जास्त सहभाग वाढावा, विविध उपक्रमांमधून युवकांची सामाजिक जाणीव आणि क्रीडा क्षेत्रातील रुची वाढावी; तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळण्यासाठी 'विकसित भारत युवा कनेक्ट' कार्यक्रमा अंतर्गत विविध उपक्रमांचं आयोजन करण्यासंदर्भात-- विविध  सूचना मांडवीय यांनी दिल्या.

**<u>राजनाथ</u>**

दहशतवादाला प्रत्युत्तर देण्याचा, बचाव करण्याचा आणि सीमेपलीकडून होणाऱ्या कोणत्याही हल्ल्यांना प्रतिबंध करण्याचा भारताला अधिकार आहे; असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांच्याशी दूरध्वनीवरून झालेल्या संभाषणात, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने मोजून मापून कारवाई केल्याचं सांगून त्यात कोणताही अतिरेक नव्हता तसंच ती प्रमाणबद्ध आणि दहशतवादी पायाभूत सुविधा निष्क्रिय करण्यावर केंद्रित होती असं सांगितलं. सिंग आणि हेगसेथ यांनी भारत-अमेरिका संरक्षण भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी आणि क्षमता बांधणीत सहकार्य मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या तसंच नव्या उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी चर्चा केली.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल रात्री अमेरिकेतील पेंटागॉन इथे  अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांची भेट घेतली. भारत-अमेरिका संरक्षण संबंधांच्या धोरणात्मक महत्त्वावर भर देत त्यांनी हे संबंध द्विपक्षीय संबंधांच्या "सर्वात महत्त्वपूर्ण स्तंभांपैकी एक" असल्याचं म्हटलं आहे. वॉशिंग्टनमध्ये क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत असून उच्चस्तरीय भारत-अमेरिका संवादांच्या मालिकेतील हे आणखी एक महत्त्वाचं पाऊल आहे.

**<u>उदयगिरी</u>**

भारतीय नौदलात लढाऊ नौका उदयगिरी आणि आयएनएस तमाल या दोन जहाजांचा समावेश केला आहे . प्रोजेक्ट १७ए स्टिल्थ फ्रिगेटमधील दुसरं जहाज असलेलं उदयगिरी काल भारतीय नौदलाकडे सोपवण्यात आलं. हे जहाज पारंपारिक आणि अपारंपारिक अशा दोन्ही धोक्यांना तोंड देण्याकरता सक्षम आहे. दरम्यान, भारतीय नौदलाने रशियातील कॅलिनिनग्राड इथल्या यंतर शिपयार्ड इथे आयएनएस तमाल जहाज तैनात केलं आहे. आयएनएस तमाल ही युद्धनौका ब्रह्मोस हे लांब पल्ल्याचं क्षेपणास्त्र आणि हमसा-एनजी सोनार प्रणालीने सुसज्ज आहे; समुद्रात एक शक्तिशाली हालचाल करणारा किल्ला म्हणून तमाल उभं राहिलं आहे.

**<u>कैलास मानसरोवर</u>**

कैलास मानसरोवर यात्रा २०२५ च्या यात्रेकरूंची पहिली तुकडी कैलास पर्वत आणि मानसरोवरची तीर्थयात्रा पूर्ण करून काल गंगटोक इथे सुखरूप परतली. ही तुकडी काल दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी नथुला इथे पोहोचली.

सिक्कीम पर्यटन विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र छेत्री यांच्यासमवेत अतिरिक्त मुख्य सचिव सी.एस. राव यांनी ही आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण तीर्थयात्रा यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सर्व यात्रेकरूंचं अभिनंदन केलं.

दरम्यान आगामी अमरनाथ यात्रेतील यात्रेकरूंना सुरक्षित सुखरूप प्रवास करता येण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने काल जम्मू आणि काश्मीरच्या अधिकाऱ्यांसोबत एक आढावा बैठक घेतली.

**<u>विंबलडन</u>**

टेनिस जगतात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जॅनिक सिनर याने विंबल्डनच्या पुरुष एकेरी स्पर्धेच्या पहिल्या फेरीत इटलीच्या लुका नार्डी याचा सरळ सेटमध्ये पराभव केला. आतापर्यंत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता ठरलेल्या नोवाक जोकोविचने फ्रेंच खेळाडू अलेक्झांड्रे मुलर विरुद्धच्या पहिल्या फेरीतील सामन्यात ४ सेटमध्ये विजय मिळवून आठव्या विम्बल्डन विजेतेपदासाठी आपला प्रयत्न सुरू केला आहे. दरम्यान भारतीय खेळाडू आज पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीपासून आपल्या कामगिरीला सुरुवात करतील. रोहन बोपण्णा, युकी भांब्री, श्रीराम बालाजी आणि रित्विक चौधरी बोलीपल्ली यांचा यामध्ये सहभाग आहे.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

महिला टी-२० क्रिकेटमध्ये, काल रात्री ब्रिस्टल इथल्या काउंटी ग्राउंडवर झालेल्या 5 सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने इंग्लंडचा २४ धावांनी पराभव केला. या विजयासह, भारतीय संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील तिसरा सामना शुक्रवारी लंडनमधील केनिंग्टन ओव्हल इथे भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता सुरू होईल.

**<u>क्रिकेट</u>**

अँडरसन – तेंडूलकर चषक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहॅम इथल्या एजबस्टन इथे सुरु होणार आहे. पहिला सामना गमावल्यानंतर भारत चांगल्या कामगिरीच्या अपेक्षेत असला, तरी संघाला कदाचित जसप्रीत बुम्राची अनुपस्थिती जाणवण्याची शक्यता आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गुजरात, राजस्थान तसंच महाराष्ट्राच्या काही भागांसह, उत्तर आणि मध्य भारतात पावसाचा नारंगी बावटा जारी केला आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणीही आज मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल. पूर्व भारतात, अरुणाचल प्रदेश आणि ओडिशामध्येही आज अशीच हवामान परिस्थिती राहील. तर आसाम, मेघालय, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक किनारपट्टी, झारखंड, केरळ आणि माहे इथे मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना मदत करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. भूस्खलनात परतीचा मार्ग वाहून गेल्यामुळे २८ जूनपासून उत्तराखंडमधील यमुनोत्री धामजवळील जानकी छट्टी गावात महाराष्ट्रातील सुमारे दीडशे पर्यटक अडकले आहेत

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार